# Study Material

# M.A.III Sem

# International Economics

**आंतरराष्ट्रीय मुद्रा निधी  पृष्ठ क्र.२ते ९**

**व**

**व्यापारापासून मिळणारा लाभ व त्यांचे वितरण पृष्ठ क्र.१० ते १४**

# आंतरराष्ट्रीय मुद्रा निधी

(International Monetary Fund)

आंतरराष्ट्रीय नाणे निधी (आंतरराष्ट्रीय मुद्राकोष)

दुसऱ्या महायुध्दानंतर निर्माण होणाऱ्या मौद्रिक समस्या सोडविण्याकरिता कोणत्या प्रकारची यंत्रणा उपयुक्त ठरेल याबाबत युध्द चालू असतानाच चर्चा सुरू होती. इ.स. १९४३ मध्ये इंग्लंडने मांडलेल्या प्रस्ताव केन्स योजना म्हणून ओळखला जातो. ह्या योजनेत एका आंतराष्ट्रीय समाशोधन संघाची आवश्यकता असल्याचे मांडण्यात आले. तसेच अमेरिकेच्या डॉ. हेन्री व्हाईट ह्यांनी सुचविलेली 'व्हाईट योजना' प्रसिध्द झाली. ह्या योजनेत आंतरराष्ट्रीय स्थायीकरण कोषाची संकल्पना समाविष्ट होती. ह्या योजनांवर विचार करण्यासाठी संयुक्त संस्थानातील ब्रेटन वुडस येथे जुलै १९४४ मध्ये अमेरिकेने एक आंतरराष्ट्रीय परिषद भरविली. ह्या ब्रेटन वुडस् परिषदेत भारतासह ४४ राष्ट्रांनी भाग घेतला होता. सर्वांच्या विचार विनिमयानंतर आंतरराष्ट्रीय सहकार्यासाठी दोन संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. ह्या दोन संस्था म्हणजेच आंतरराष्ट्रीय नाणे व विश्व अधिकोष होत.

ह्या आंतरराष्ट्रीय मुद्रानिधीच्या कार्याला प्रत्यक्षात १९४५ मध्ये सुरूवात झाली. ह्या परिषदेत सम्मीलीत देशांपैकी ज्यांनी ३१ डिसेंबर १९४५ च्या पूर्वी निधीची सदस्यता स्विकारली त्यांना 'प्राथमिक' सदस्य म्हणून मान्य करण्यात आले. इतर राष्ट्रे त्यानंतरही सभासद झालेत व अद्यापही होऊ शकतात.

## आंतरराष्ट्रीय नाणे निधी स्थापण्याची आवश्यकता :

१. सुवर्णमान पध्दती तुटल्यानंतर प्रत्येक राष्ट्राने आपल्या सोयीनुसार विनिमय धोरण स्विकारण्यास सुरूवात केली. बरेचदा ही धोरणे परस्पर विरोधी असत. शोधन शेष सतत असंतुलित होऊ लागल्यामुळे अनेक देशांनी आपापल्या चलनांचे अवमूल्यन केले ह्याला शह देण्याकरिता इतर देशांनीही स्पर्धात्मक अवमूल्यनाला सुरूवात केली. ह्यामुळे विनिमयदरातील कोणताही बदल एकतर्फी न होता आंतरराष्ट्रीय विचारविमर्षानंतर व्हावा असे सर्वांना वाटू लागले. हे सर्व प्रश्न सोडविण्याकरिता एका सर्वमान्य मौद्रिक संघटनेची आवश्यकता वाटू लागली.

२. युध्दकाळात कागदी चलनाचा पुरवठा मोठ्या प्रमाणावर वाढल्यामुळे बहुतेक सर्व राष्ट्रांची स्फित्तीक्षमता निरनिराळ्या स्तरावर वाढून मूल्यस्तरातील पुर्वीचे सांमजस्य पूर्णतः नष्ट झाले. ह्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापाराला धोका निर्माण झाला.

३. महायुध्दाचा एक गंभीर परिणाम म्हणजे त्यांच्यात संकुचित राष्ट्रवाद फार मोठ्या प्रमाणात वाढला होता. प्रत्येक देश इतर देशांची पर्वा न करता स्वहित साधण्याकरिता विनिमय नियंत्रण करीत होता. त्यामुळे स्पर्धात्मक अवार्हणाचा धोका पुन्हा निर्माण झाला.

४. महायुध्दामुळे युरोपियन आशियाई देशांची औद्योगिक व कृषी उत्पादकता बरीच घटली होती. त्यांच्या खाणी, कारखाने, दळणवळणाची साधने इत्यादी नष्ट झाले होते. त्याच्या पुनर्निर्माणाचा प्रश्न सोडविणे अत्यावश्यक झाले होते.

५. अविकसित व अर्धविकसित देशांना सहाय्य करून त्यांच्या आर्थिक प्रगतीची गती वाढविणे आवश्यक होते. त्याशिवाय जागतिक शांततेचा प्रश्न सोडविणे शक्य नव्हते.

६. १९३० च्या महामंदीनंतरच्या काळात आंतरराष्ट्रीय राखीवांची दुर्मिळता तीव्रतेने जाणवू लागली. राखीव निधी पर्याप्त नसल्यास त्या देशाला संपूर्ण अर्थव्यवस्थेत बदल घडवून आणावे लागतात किंवा विनिमयदरात बदल घडवून आणावा लागतो किंवा विनिमय नियंत्रणाचा क्लिष्ट मार्ग शोधावा लागतो. म्हणून विदेशी विनिमय राखीवांची व्यवस्था करणे आवश्यक होते.
७. महामंदीच्या १९३० नंतरच्या कालखंडाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे राष्ट्राराष्ट्रांमध्ये सहकार्याचा व विचारविनिमयाचा पूर्ण अभाव होता. प्रत्येक राष्ट्र हे इतरांची अजिबात पर्वा न करता आपली धोरणे आखून ती कार्यान्वित करीत होते. त्यामुळे ह्याचे इतर राष्ट्रांना दुष्परिणाम भोगावे लागत होते.
८. महामंदीनंतरच्या काळातील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे भांडवलाची पलायने किंवा स्थानांतरणे होय. भांडवलाच्या हालचालींचे वित्तीय व्यवस्थेवर गंभीर परिणाम होतात. म्हणून ह्या अल्पकालीन भांडवलाच्या आगमन-निर्गमनावर नियंत्रण असणे आवश्यक होते

ह्या विविध समस्यांच्या सोडवणुकिसाठी अशा एका मौद्रिक संस्थेची गरज होती.

## आंतरराष्ट्रीय नाणे निधी किंवा मुद्राकोषाची उद्दिष्टे :

मुद्रानिधीच्या कराराच्या पहिल्या कलमानुसार निधीची पुढील उद्दिष्टे मान्य करण्यात आली आहेत.

१. एक स्थायी संस्था प्रस्थापित करून तिच्याद्वारे मौद्रिक समस्या सोडविण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य मिळविणे.
२. आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सतत विकास घडवून आणणे व हे करतांना त्यात महत्तम संतुलन साधणे
३. राष्ट्रांचे विनिमय दर शक्य तितके स्थिर ठेवल्यास मदत करणे व त्याद्वारे स्पर्धात्मक विनिमय अवमूल्यनाला आळा घालणे.
४. आंतरराष्ट्रीय शोधनाचे प्रश्न सोडविण्यासाठी बहुमुखी शोधनाची व्यवस्था करून त्याद्वारे विनिमय नियंत्रण पध्दती बंद करणे.
५. सदस्य राष्ट्रांच्या शोधनशेषातील असाम्य किंवा असंतुलन दूर करण्यासाठी त्यांना कर्ज देऊन विदेशीचलनाचा (विनिमयाचा) पुरवठा करणे.
६. वरील विविध उपाययोजनांद्वारे आंतरराष्ट्रीय शोधनशेषातील असंतुलनाची मात्रा व कालावधी शक्य तेवढा कमी करणे.

ह्यावरून स्पष्ट होते की, विनिमयदरातील स्थिरता, अवमूल्यनाच्या समस्या, विनिमय नियंत्रणाचा निषेध, बहुमुखी शोधन व्यवस्था इत्यादी आंतरराष्ट्रीय व्यापराच्या मार्गातील सर्व तात्कालिक समस्या आंतरराष्ट्रीय सहकार्याने सोडविणे हे मुद्रानिधीचे मुख्य कार्य आहे.

## आंतरराष्ट्रीय नाणे निधीची संसाधने (Resourses of IMF) :

एवढ्या प्रचंड प्रमाणावर कामे करणाऱ्या आंतरराष्ट्रीय संस्थेची संसाधने ही मोठ्या प्रमाणावर असली पाहिजेत. ह्याकरिता प्रत्येक सदस्य राष्ट्राची सांपत्तिक स्थितीत पाहून त्यानुसार प्रत्येकाचे अभ्यंश (Quotas) ठरवून देण्यात आले आहेत. सुरूवातीला त्यापैकी सर्वात मोठे पहिले पाच अभ्यंश पुढीलप्रमाणे होते.

| देशाचे नांव | अभ्यंश | एकुण भांडवलाशी शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १. संयुक्त संस्थाने (USA) | २७५ कोटी डॉलर्स | ३४.२ |
| २. ब्रिटन | १३० कोटी डॉलर्स | १६.२ |
| ३. राष्ट्रीय चीन | ५५ कोटी डॉलर्स | ६.८ |
| ४. फ्रान्स | ५२.५ कोटी डॉलर्स | ६.० |
| ५. भारत | ४० कोटी डॉलर्स | ५.० |

सुरूवातीला सोव्हिएम रशिया IMF चा सभासद होता. पण पुढे काही तात्विक मतभेदावरून रशियाने आपले सभासदत्व रद्द केले. त्यामुळे भारताला पहिल्या पाच सदस्यांमध्ये स्थान मिळाले. निधीच्या प्रारंभ काळात ४४ राष्ट्रांच्या अभ्यंशामुळे निधीला ८८० कोटी डॉलर्सची संसाधने मिळाले. डिसेंबर १९५८ मध्ये सदस्यसंख्या ६८ होऊन एकून संसाधने ९२१ कोटी डॉलर्स पर्यंत वाढली. १९५९ मध्ये निधीच्या दिल्ली येथे भरलेल्या वार्षिक सभेत संसाधने वाढविण्यासाठी प्रत्येक राष्ट्राने आपला अभ्यंश किमान ५ टक्क्याने वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे भारताचा अभ्यंश ६० कोटी डॉलर्स झाला. काही देशांनी ठरविल्यापेक्षा जास्त अभ्यंश दिला. त्यामुळे १९७४ मध्ये निधीजवळील अभ्यंश ३००० कोटी डॉलर्स पर्यंत वाढले. त्यात भारताचा अभ्यंश ९४ कोटी डॉलर्स एवढा झाला. १९७४ मध्ये सदस्य संख्या १२६ झाली. सध्या निधीच्या सदस्यांची संख्या १७८ झालेली आहे.

आंतरराष्ट्रीय नाणे निधीच्या स्थापनेच्यावेळी निधीची हिशेबाची मुद्रा अमेरिकन डॉलरमध्ये निश्चित करण्यात आली होती. कारण त्यावेळी डॉलर हे जगातील सर्वात शक्तिशाली चलन होते. डॉलरच्या १ मात्रेचे मूल्य हे ०.८८८६७१ ग्रॅम सुवर्ण होते. परंतु १९७२ पासून निधीचे खाते विशेष आहरण राखीव (Special Drawing Reserves = S.D.R.) मध्ये ठेवल्या जात आहे व सदस्य राष्ट्रांच्या चलनांचे मूल्यही SDR मध्येच व्यक्त केले जाते. जाने. १९८१ पासून SDR चे मूल्य हे अमेरिकन डॉलर, जर्मन मार्क, फ्रांसचा फ्रँक, जपानचा येन व ब्रिटचा पौंड ह्या ५ प्रमुख चलनाच्या आधारे निर्धारित करण्यात येते. १९९२ मध्ये १ SDR = १.४० डॉलर हा दर होता.

सध्या प्रत्येक देशाच्या चलनाच्या एककाचे मूल्य SDR मध्ये निश्चित केले जाते. आता मात्र विभिन्न चलनांचा परस्परांशी विनिमयदर हा त्यांच्या मागणी पुरवठ्याच्या परिस्थितीनुसार बदलत असतो. ह्याचा अर्थ नाणे निधीद्वारा सुरू करण्यात आलेली समता दरांची प्रणाली बंद झालेली आहे.

निधीच्या स्थापनेपासून १३ वर्षे पर्यंत सदस्य राष्ट्रांच्या अभ्यंशामध्ये (कोट्यामध्ये) कोणताही बदल करण्यात आला नाही. १९५८ मध्ये दिल्लीत भरलेल्या सम्मेलनात निधीच्या साधनात ५० टक्क्यांची वाढ करावी असा ठराव संमत करण्यात आला. २६ फेब्रु. १९६५ ला सदस्य राष्ट्रांच्या अभ्यंशामध्ये २५ टक्के वाढ करण्यात आली. १९७० मध्ये तिसऱ्यांदा वृध्दी करण्याची शिफारस करण्यात आली त्यामुळे अभ्यशांची एकून रक्कम २८९० कोटी डॉलर्स झाली.

आता प्रत्येक सभासद राष्ट्राच्या चलनाचे मूल्य SDR मध्ये निश्चित करण्यात येते. विविध देशातील चलनांचे परस्परांतील विनिमयदर हे बाजारातील त्यांच्या मागणीपुरवठ्यानुसार बदलत असतात. अशाप्रमारे नाणे निधीतर्फे सुरू करण्यात आलेल्या समता दर प्रणालीचा अंत झाला.

१९७८ मध्ये करण्यात आलेल्या वाढीनुसार मुद्राकोषाची साधनसंपत्ती २९.२ बिलीयन SDR वरून वाढून ३९ बिलीयन SDR (अंदाजे ४६ बिलीयन डॉलर्स) झाली. ऑक्टो. १९९० मध्ये हा कोष वाढून ५८ बिलीयन SDR झाला. ह्यानंतर आणखी काही राष्ट्रे सदस्य झाल्यामुळे हा कोष वाढून ६१ बिलीयन SDR झाला.

सप्टेंबर १९८९ पर्यंत मुद्राकोषाची एकूण राशी १३२.६ बिलीयन SDR झाली. जुलै १९९६ पर्यंत निधीचा एकूण कोष १४५.३ बिलीयन SDR एवढा होता.

ह्या एकूण मुद्राकोषात सर्वाधिक अभ्यंश अमेरिकेचा आहे. त्यानंतर जर्मनी, जपान, फ्रांस, ब्रिटन ह्याचा क्रम आहे. ह्या अंशदानात भारताचा १२ वा क्रमांक आहे.

## आंतरराष्ट्रीय नाणे निधीचे प्रशासन व संघटन :

१) बोर्ड ऑफ गव्हनर्स : नाणे निधीचा सर्वोच्च अधिकारी बोर्ड ऑफ गर्व्हनर्स असून ह्यात प्रत्येक सदस्य देशाचा गव्हर्नर व एक विकल्प गव्हर्नर असतो. ह्या बोर्डाची वर्षातून एकदा बैठक होते.

२) बोर्ड ऑफ एक्झिक्युटिव्ह डायरेक्टरर्स : बोर्ड ऑफ गव्हर्नर्स आपले अरेचसे अधिकार ह्या बोर्डकडे सोपवितो. ह्यातील ६ सदस्य महत्तम अभ्यंश असणाऱ्या सदस्य राष्ट्रांचे प्रतिनिधी असतात अमेरिका, ब्रिटन जर्मनी, फ्रान्स जपान व सौदी अरेबिया आणखी १६ निर्देशक बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे इतर सभासद निवडतात.

## आंतरराष्ट्रीय मुद्रानिधीची कार्यप्रणाली : (Working Producer of IMF) :

विविध उद्दिष्टे साधण्याकरिता मुद्रानिधी पुढील कार्ये करतो.

१) ऋण आर्थिक मदत देणे : सदस्य राष्ट्रांना विनिमयदर स्थिर ठेवण्याकरीता ऋण देऊन विदेशी चलनांचा पुरवठा करणे हे मुद्रानिधीचे महत्वाचे उद्दिष्ट आहे. ह्या ऋणासंबंधी IMF च्या कार्य पध्दतीचे काही नियम ठरले आहेत. i) कोणतेही सदस्य राष्ट्र एका वर्षात आपल्या अभ्यंशाच्या २५ टक्के महत्तम कर्ज घेऊ शकते. ii) ह्या कर्जामुळे सदस्य राष्ट्राला IMF कडून जेवढे विदेशी चलन मिळेल त्याच्या सममूल्य देशी चलन त्याला IMF कडे जमा ठेवावे लागते. iii) जोपर्यंत IMF जवळ जमा केलेला विदेशी चलनाचा साठा त्याच्या अभ्यंशाच्या दुप्पट होणार नाही तोपर्यंत सदस्य राष्ट्र सतत कर्ज काढू शकतो. प्रत्येक राष्ट्राने अभ्यंशाच्या ७५ टक्के देशी चलन जवळ सुरूवातीलाच दिले असते. ह्यामुळे त्याला अभ्यंशाच्या १२५ टक्के इतकेच जास्तीत जास्त कर्ज मिळू शकते. ह्या नियमता ने १९५५ आणखी सूट दिली आहे विशेष परिस्थितीत आता अभ्यंशाच्या सममूल्यापर्यंत कर्ज देऊ शकतो. प्रत्यक्ष विदेशी चलनाच्या मदतीच्या व्यतिरिक्त जमानती प्रत्ययाच्या मदतीचे अभिवचन देण्याची पध्दती १९५५ पासून सुरू करण्यात आली आहे.

## IMF तर्फे देण्यात येणाऱ्या कर्जाचे विविध प्रकार :

**अ ) संकटकालीन कर्ज** : अचानक राजकीय किंवा आर्थिक संकट उद्‌भवल्यास व त्यामुळे इतर देशांनही धोका हाणयाचा संभव असल्यास IMF ताबडतोब कर्जाची व्यवस्था करतो. १९५५ मध्ये सुवेद कालवा संकटाच्या वेळी ने ब्रिटेनला ५६१० लक्ष डॉलर्सचे कर्ज व ७३९० लक्ष डॉलर्सची जमानती प्रत्यय दिला. १९६२ व १९६३ मध्ये IMF ने भारताला १००० लक्ष डॉलर्सची कर्जे दिलीत. तसेच शोधनशेषातील तूट दूर करण्याकरिता भारताला ५ अरब SDR चे कर्ज मंजूर करण्यात आले.

**ब ) हंगामी किंवा सामाजिक कर्ज** : शोधनशेषातील तात्पुरते असंतुलन दूर करण्याकरिता IMF ६ ते १२ महिन्यापर्यंत कर्ज देतो. असे कर्ज क्युबा, एलसेल्बेडोर इत्यादींना मिळाले आहे.

**क ) चालू खात्यातील तूट भरून काढण्याकरिता कर्ज** : अविकसित व विकसनशिल देशांना आपल्या आर्थिक योजना सफल करण्याकरिता थोड्या प्रमाणावर आयात करावी लागते. त्यामुळे शोधनशेषात तूट येत असते. ह्याकरिता IMF अशा देशांना तात्पुरते कर्ज देत असतो. अशाप्रकारे कर्ज कॅनडा, फ्रान्स, जपान, भारत इत्यादी राष्ट्रांना मिळाले आहे.

**ड ) विनिमय दरात स्थैर्य आणण्याकरिता कर्ज** : अशा प्रकारचे कर्ज वेळोवेळी ब्रिटन, अमेरिका, फ्रान्स, भारत, जपान, ब्राझील इत्यादी राष्ट्रांना देण्यात आले आहे. १९८१-८२ मध्ये भारताला अशा कार्याकरिता ५ कोटी SDR चे ऋण मंजूर करण्यात आले होते.

**इ ) कर्जाची शुल्क** : IMF जवळ ज्या देशाचे चलन त्याच्या अभ्यंशापेक्षा जास्त होते तो देश चा कर्जदार किंवा ऋणको होतो. अशावेळी IMF त्या देशाच्या अभ्यंशापेक्षा अधिक झालेल्या रकमेवर शुल्क आकारतो. ३ महिने पावेतो असणाऱ्या कर्जावर कोणतेही शुल्क आकरण्यात येत नाही. पण त्यापेक्षा जास्त मुदतीवर १ वर्षाचे शुल्क वसूल करण्यात येते. मे १९८४ पासून शुल्काचा दर दरसाल दर शेकडा करण्यात आला.

**२. दुर्लभ मुद्रा** (Hard Currency) : ज्या देशाला चलनाची सतत मागणी आहे परंतु IMF जवळ ते चलन पुरेशा प्रमाणात नसेल तर त्या संबंधित देशाकडून ते चलन IMF उधार घेते किंवा सुवर्णाच्या मोबदल्यात ते खरेदी करू शकते. एवढे क रूनही त्या चलनाचा पुरवठा कमी पडत असेल तर ते चलन दुर्लभ म्हणून घोषीत करून IMF ला त्याचे रेशनिंग करण्याचा अधिकार मिळतो.

**३. पुन्हा खरेदी** : जेव्हा कोणताही IMF देश जवळून कर्ज घेतो तेव्हा तो आपले चलन ला विकून दुसऱ्या देशाचे चलन विकत घेतो. त्या देशाला आपले हे चलन ५ वर्षाच्या आत पुन्हा खरेदी करावे लागते.

**४. जमानती व्यवस्था** : ह्या व्यवस्थेच्या अंतर्गत सदस्य राष्ट्राच्या परिस्थितीची चौकशी न करता त्याला एक निश्चित अवधीकरिता एका निश्चित रकमेपर्यंत कर्ज देऊ शकते. त्या देशाला आपले विनिमय नियंत्रण शिथिल करावयाचे असते अशा देशाला हे सहाय्य करण्यात येते.

**५. तांत्रिक मदत** : वित्तीय मदती बरोबरच गरजू सदस्यांना तांत्रिक मदत तसेच मौद्रिक व राजकोषीय गोष्टीत उपयुक्त सल्ला पण देते. ह्याकरिता ने १९६४ पासून केंद्रिय अधिकोषण विभाग व राजकोषीयविषयक विभाग असे दोन विभाग काढले आहेत. ह्या दोन विभागांचे तन्ज्ञ सदस्य राष्ट्रांना आवश्यकतेनुसार सल्ला व सेवा देत असतात.

**६. प्रशिक्षणाची व्यवस्था** : ने निरनिराळ्या सदस्य राष्ट्रांतून तांत्रिक शिक्षण देण्याकरिता १९५१ मध्ये वाशिग्टन येथे प्रशिक्षण केंद्र चालू केले आहे. त्या ठिकाणी आपल्या कर्मचाऱ्यांद्वारे मूल्यगणन व नियंत्रण, विनिमय नियंत्रण, मुद्रा धोरण, प्रशुल्क धोरण, अधिकोषाचा विकास इत्यादींबाबत प्रशिक्षण दिले जाते. १९६४ नंतर ह्या कार्याला वेग आला आहे.

**७. संरचनात्मक समायोजनाची सोय** : मार्च १९८६ पासून ह्या सोयीची व्यवस्था करण्यात आली आहे. डिसे. १९८७ मध्ये ह्या सोयीचा विस्तार करण्यात आला व गरीब देशांना ६ दशलक्ष एवढे रियासती सहाय्य देण्याचा ठराव करण्यात आला. भारतासहित ६२ देश सध्या ह्या मदतीला पात्र आहेत.

**८. विविध आंतरराष्ट्रीय व वित्तीय संस्थांना विकासार्थ सहाय्य** : मुळेच विश्व अधिकोष, आंतरराष्ट्रीय वित्त निगम, आंतरराष्ट्रीय विकास संघ इत्यादी सहाय्यक संस्थाचा उदय व विकास झाला आहे. ह्या संस्थांद्वारा विकसनशील देशांना मोठ्या प्रमाणात सहाय्य मिळत आहे.

**९. विकसनशिल देशांना विशेष मदत** : सदस्य राष्ट्रांनी आपल्या शोधनशेषात सुधारणा करावी व मौद्रिक स्थैर्य आणावे ह्याकरिता ने सढळ हातने मदत केली आहे व पुढील प्रमुख योजना अंमलात आणल्या आहेत.

क्षतिपूरक वित्तीय सोयी, बफर स्टॉकची सोय, विस्तारित वित्त व्यवस्थेची सोय, संरचनात्मक समायोजनाची सोय, विकसित संरचनात्मक समायोजनाची सोय, तेल सुविधा योजना.

आंतरराष्ट्रीय मुद्रा निधीच्या कार्याचे मूल्यमापन :

स्थापने पासून ने विभिन्न क्षेत्रात आपल्या कार्याद्वारे जी उल्लेखनीय प्रगती केली आहे तिची थोडक्यात माहिती पुढील प्रमाणे देता येईल.

१. सदस्य राष्ट्रांच्या संख्येत वाढ : सुरूवातीला १ मार्च १९४७ ला ची सदस्य संख्या ४४ होती ती वाढून १९९३ पर्यत १७८ वाढली. पूर्व युरोप व रशिया हे सुध्दा सदस्य झाले आहेत.
२. आंतरराष्ट्रीय रोखतेत वाढ : आंतरराष्ट्रीय मुद्रा कोषाने आपल्या संसाधनात वाढ करून तसेच विशेष आहरण योजना सुरू करून आपल्या रोखतेत वाढ केली आहे. सध्या मुद्रा कोष ६७ अरब डॉलर कर्जदेऊ शकतो.
३. विनिमय दरांची व्यवस्था : मुद्राकोष आपल्या स्थापनेपासून १९७१ च्या आंतरराष्ट्रीय मौद्रिक संकटापर्यंत स्थिर विनिमय दराची व्यवस्था यशस्वीपणे पार पाडू शकला.
४. शोधनशेषात संतुलन राखण्यात मदत : सदस्य राष्ट्रांच्या व्यापारातील अल्पकालीन तूट दूर करणे हे मुद्राकोषाचे सुरूवातीपासूनचे उद्दिष्टय होते. शोधनशेषात निर्माण होणाऱ्या अडचणी दूर करण्याकरीता मुद्राकोषाने अमेरिका, ब्रिटन, जपान, ह्या सारख्या विकसित व भारत, इंडोनेशिया, घाना, पाकिस्तान ह्यासारख्या विकसनशील देशांना वेळोवेळी वित्तीय सहाय्य दिलेले आहे.
५. बहुपक्षीय शोधनाची व्यवस्था : देणी फेडण्याची बहुपक्षीय पध्दती अंमलात आणून चालू शोधनाची विशेष सोय केल्यामुळे विदेशी व्यापार व विदेशी भांडवलाच्या आयातातील व निर्यातीला प्रोत्साहन मिळाले.
६. कोषाचा व्यवस्थित उपयोग : आपल्या जवळील कोषाचा उपयोग पुनर्निर्माण व विकास ह्या कार्याकरिता करण्यात यशस्वी झाला आहे. पूर्वी हा आपल्या कोषाचा उपयोग शोधनशेषातील मूलभूत असंतुलन दूर करण्याकरिताच करीता होता. परंतु आता ने ह्याबाबत उदा. धोरण स्वीकारले आहे.
७. आर्थिक सहकार्य भावनेचा विकास : विविध देशांमधील आर्थिक सहकार्य वाढविण्याच्या कार्यात मुद्राकोषत्तत बरीच प्रगती केली आहे.
८. तांत्रिक सहाय्यता व प्रशिक्षण : गेल्या काही वर्षापासून विकसनशिल देशांना आर्थिक मदतीशिवाय मौद्रिक व प्रशुल्कनीतीवर महत्वपूर्ण तांत्रिक सहाय्यता देत आहे. सध्या त्याने 'केंद्रिय अधिकोषण सेवा विभाग' व

'राजकोषीय संबंधी विभागाची स्थापना' केलेली आहे. पहिला विभाग राजकोषीय विषयात मदत करून बहुमोलाचे कार्य करीत आहे.

९. आंतरराष्ट्रीय पातळीवर सुरक्षित कोषः जवळ विभन्न राष्ट्रांतून लहान लहान प्रमाणात सुवर्ण जमा होते. ह्याचा उपयोग आंतरराष्ट्रीय पातळीवर सुरक्षित कोष म्हणून होतो. संकटकाळी सदस्य राष्ट्रांना ह्या सुवर्णकोषाचा उपयोग होतो.

१०. स्पर्धात्मक चलन अवमूल्यनावर नियंत्रण : सदस्य राष्ट्र हे च्या परवानगीशिवाय, (विशिष्ट परिस्थिती वगळता) आपल्या चलनाचे अवमूल्यन करू शकत नव्हते. त्यामुळे स्पर्धात्मक अवमूल्यनाचे संकट टाळता आले.

११. इतर संस्थांशी संबंध : विश्व अधिकोष, आंतरराष्ट्रीय वित्त निगम, विकास संघास संकट कालीन कोष, अंकटाड इत्यादी वित्तीय संस्थांशी मुद्राकोष संपर्क ठेवतो. ह्यामुळे सदस्य राष्ट्रांना मदत मिळून यांचा फायदा होतो.

१२. विकसनशिल देशांना विशेष मदत : मुद्राकोषाने विकसनशिल देशांना उदारपणे सहाय्य दिले आहे व देत आहे. मुद्राकोषातर्फे देण्यात येणाऱ्या मदतीमुळे व मार्गदर्शनामुळे विविध देशांच्या शोधनशेषातील असंतुलन दूर करण्यात व मौद्रिक स्थैर्य स्थापन करण्यात यश आले आहे.

**आंतरराष्ट्रीय मुद्राकोषाच्या कार्यप्रणालीतील उणीवा :**आंतरराष्ट्रीय पातळीवर मौद्रिक व व्यापारिक सहकार्याच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय मुद्राकोषाने महत्वपूर्ण कार्ये केली असली तरी सैध्दांतिक व्यावहारिक दृष्टीतून मुद्राकोषावर बरीच टीका करण्यात येत आहे.

१. मुद्राकोषाचे मर्यादित कार्य : मुद्राकोष केवळ चालू शोधनाकरिताच विदेशी चलनाची व्यवस्था करतो. युध्द, ऋणाची फेड, आयात-निर्यात, तसेच अवरूध्द स्टर्लिंग ह्यांच्या संबंधित असलेल्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने मदत करीत नाही. परंतु अशी टीका बरोबर नाही कारण मुद्राकोषाकडे अशी विविध प्रकारची बरीच कामे दिली असती तर तो कोणतेही कार्य व्यवस्थीतपणे पार पाडू शकला नसता.

२. अभ्यंश निर्धारीत करण्याला कोणताही शास्त्रीय आधार नाही : सदस्य देशांचे अभ्यंश निश्चित करताना देशांच्या सुवर्ण व डॉलर निधीला व विदेशी व्यापाराला आत्यंतिक महत्व देण्यात आले. अभ्यंश हे कोणत्याही वैज्ञानिक आधारावर ठरविण्यात आले नाही. मुद्राकोषावर अमेरिका, इंग्लंड ह्यासारख्या काही थोड्या बड्या राष्ट्रांचे वर्चस्व आले आहे. अभ्यंश निश्चितच करताना विदेशी चलनांची गरज व व्यापार संतुलनाची स्थिती ह्यांचा विचार व्हावयास हवा. त्यामुळे गरजु व गरीब राष्ट्रांना जास्त मदत होऊ शकते.

३. अमेरिकेच्या हातातील बाहुले : मुद्राकोषावर अमेरिका व त्याच्या वर्चस्वाखाली असलेल्या राष्ट्रांचे एवढे प्राबल्य आहे की अमेरिकेशी न पटणाऱ्या राष्ट्रांना मुद्राकोषापासून फारसा लाभ होत नाही. अभ्यंशाचे वाटप करतानाच अमेरिका, इंग्लंड, राष्ट्रीय चीन व फ्रान्स ह्यांनी मिळून स्वतःकडे ६४ टक्के अभ्यंश घेतले आहे. त्यामुळे अमेरिकेचे मुद्राकोषाच्या कारभारात वर्चस्व आहे.

४. नामधारी लोकशाही : निधीच्या कारभारात मताधिकार हा राष्ट्रांच्या अभ्यंशावर आधारित असल्यामुळे वरील चार राष्ट्रे वगळता बाकीच्या सर्व राष्ट्रांचे एकमत होऊनही ही राष्ट्रे ह्या चार राष्ट्रांविरूध्द निर्णय घेऊ शकत नाही. मताधिकार अभ्यंशाप्रमाणे असमान आहेत. एवढेच नव्हे तर, ऋणी राष्ट्रांचा मताधिकार त्यांच्या हीनार्थाच्या प्रमाणात आधिक्य राष्ट्राला मिळत असतो. ह्यामुळे ही विषमता आणखीच वाढते. अमेरिकेचे

आधिक्य सर्वात जास्त असल्यामुळे अमेरिकेचा एकाधिकार निर्माण झाला आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय मुद्राकोशाच्या कारभारातील लोकशाही केवळ नावापुरतीच आहे.

५. राजकीय भेदभाव : मुद्राकोषाच्या कारभारातही अमेरिकेचे रशिया व इतर साम्यवादी राष्ट्रांशी असलेले वैर दिसून येते. बरेच वर्षे पर्यंत साम्यवादी चीन सारख्या मोठ्या राष्ट्राऐवजी अत्यंत छोट्या असलेल्या राष्ट्रीय चीनला प्रथम पाच सन्मानित राष्ट्रांमध्ये आणले. तसेच संचालक मंडळात तीन जागा केवळ अमेरिकन राष्ट्राकरिताच राखीव ठेवण्यात अमेरिकेची उघड पक्षपाती वृत्ती दिसून येते.

६. शिथिल अनुशासन : मुद्राकोष काही बड्या राष्ट्रांविरूध्द कडक कारवाई करण्याची हिंमत करू शकत नाही. १९४८ मध्ये फ्रान्सने मुद्राकोषाला न जुमानता ४४ टक्के विनिमय अवमूल्यन केले. फ्रान्स विरूध्द मुद्राकोषाने कोणताही कारवाई केली नाही, याउलट सुवेझ कालवा व संकटाचे वेळी त्याला अवास्तव ऋण देऊन मदत केली.

७. अविकसित देशांकडे दुर्लक्ष : मुद्राकोषावर भांडवलशाही राष्ट्रांचे प्राबल्य अजूनही आढळते. त्यामुळे तो आशिया व आफ्रिका खंडातील गरीब व अविकसित राष्ट्रांच्या समस्यांकडे फारसे लक्ष देत नाही.

८. विनिमय नियंत्रणपध्दतीचे अस्तित्व : मुद्राकोषाचे एक प्रमुख उद्दिष्ट म्हणजे देशांची चलने बहुपरिवर्त्य करून विनिमय नियंत्रण हटविणे हे आहे. परंतु ह्या दृष्टीने मुद्राकोषाने विशेष प्रकारची अशी कोणतीही उपाययोजना अंमलात आणली नाही. राष्ट्रांमधील आर्थिक विषमता वाढत असल्यामुळे मार्क व येन ही नाणी अजूनही दुर्मिळ आहेत, व विनिमयनियंत्रणाचे क्षेत्र कमी होण्याऐवजी वाढत आहे.

९. दीर्घकालीन कर्जाची व्यवस्था नाही : आंतरराष्ट्रीय मुद्राकोष अल्पकालीन कर्ज देण्याची सोय करतो, परंतु अधिकांश विकसनशिल देशांना दीर्घमुदतीच्या कर्जाची आवश्यकता असते. त्यामुळे गरीब राष्ट्रांची अडचण होते. परंतु आता मुद्राकोषाने दीर्घकालीन सहाय्यता देण्यास सुरूवात केली आहे.

१०. रोखतेची समस्या अजूनही भेडसावत आहे : मुद्राकोषाने एस.डी. आर. च्या माध्यमाद्वारे आंतरराष्ट्रीय रोखता वाढविण्याचा स्तुत्य प्रयत्न केला असला तरी रोखतेची समस्या अजूनही सुटलेली नाही.

मुद्राकोषाच्या कारभारात अशा काही त्रुटी असल्या तरी ही अत्यंत लोकोपयोगी संस्था असून जगाची बहुमूल्य सेवा करीत आहे ही गोष्ट नाकारता येत नाही.

*******

# व्यापारापासून मिळणारा लाभ व त्यांचे वितरण

(Measurement of Gains and their Distribution)

**व्यापार लाभः-** व्यापारापासून लाभ होतो व आंतरराष्ट्रीय व्यापारापासून जास्त प्रमाणात लाभ होतो. आजच्या युगात आंतरराष्ट्रीय व्यापार अनिवार्य आहे. याद्वारे आपसातील देवाण-घेवाण व मागणीही वाढू शकते. म्हणून ज्या देशांचा विदेशी व्यापार प्रगतीपथावर असतो ते देश समृध्द संपन्न असतात, याउलट ज्या देशांचा विदेशांशी असणारा व्यापार योग्य रीतीने चालत नाही ते देश मागासलेले व गरीब राहतात. म्हणून आर्थिक विकास व उन्नतीकरिता आंतरराष्ट्रीय व्यापार आवश्यक आहे.

वस्तूंच्या व्यय अनुपात किंवा विनिमय गुणोत्तर असमान असताना दोन देशात वस्तूंचा लाभदायक व्यापार कसा सुरू होतो ह्याची कल्पना पूर्वी आपण अभ्यासलेल्या रिकार्डोच्या तुलनात्मक व्यय (लाभ) सिध्दांतावरून येते. तसेच आंतरराष्ट्रीय व्यापार सुरू झाल्यामुळे देशांच्या एकूण उत्पादनातही वाढ होते.

अंतर्गत व्यापारातील लाभ सहज मोजता येतो. परंतु आंतरराष्ट्रीय व्यापारातील लाभ मोजताना बऱ्याच अडचणी येतात. ह्यातील महत्वाच्या अडचणी म्हणजे लाभाची व्याख्या करणे व त्याचे मोजमाप करण्याकरिता आधार ठरविणे ह्या होत.

**व्यापार लाभाचे विवेचन :**

अभिमतपंथी अर्थशास्त्रज्ञांनी व्यापार लाभाच्या स्पष्टीकरणार्थ पुढील तीन पध्दतींचा उपयोग केला आहे.

१. तुलनात्मक व्यय सिध्दांतानुसार विशिष्ट उत्पादनाकरिता येणाऱ्या उत्पादन खर्चातील बचत हे लाभाचे निदर्शक आहे.
२. व्यापार सुरू झाल्यावर उत्पन्नात जी वाढ होते तिला लाभाचे प्रतिक मानणे.
३. व्यापार अटींना आंतरराष्ट्रीय श्रमविभाजनाचे आणि लाभातील प्रवृत्तीचे गमक मानणे.

रिकार्डोच्या मते, एखादी वस्तू स्वदेशात निर्माण करण्याऐजवी निर्यातीच्या बदल्यात ती आयात केल्यास उत्पादन खर्चात बचत होते, त्यावरून व्यापार लाभ मिळाल्याचे सिध्द होते व त्या लाभाचे मोजमापही करता येते, परंतु हे मत माल्थस ह्यांना मान्य नाही.

माल्थसच्या मते, कमी इच्छिलेली वस्तू देऊन जास्त इच्छिलेली वस्तू मिळविताना निर्माण होणारे वाढभव मूल्य म्हणजे व्यापार लाभ होय. विदेशांशी व्यापार केल्याने संपत्तीच्या विनिमय मूल्यात निश्चितपणे वाढ होत असते.

रिकार्डोच्या काळापासून वस्तूगत व्यापार अटींना लाभाच्या प्रवृत्तीचे निदर्शक मानले जाऊ लागले आहे. व्यापार अटींमुळे दोन देशांना मिळणाऱ्या लाभाची कल्पना येऊ शकते.

मिलच्या मते, तुलनात्मक उत्पादन व्ययात भिन्नता असल्यास दोन्ही देशांना लाभ मिळू शकतो व त्या लाभाची दोन देशांमध्ये होणारी विभागणी व्यापार अटींवर अवलंबून असते. मिलच्या मते प्रत्यक्ष विनिमय दर हा अन्यान्य

किंवा पारस्पारिक मागणीद्वारे निश्चित होतो. आयातीचे मूल्या निर्यातीद्वारे फेडल्या जाईल व दोन्ही देशांना योग्य लाभ मिळेल अशाप्रकारे हा विनिमय दर संतुलित होतो. हयाची चर्चा मिलच्या सिध्दांतात केलेली आहे.

मार्शल ह्यांनी अन्योन्य मागणीचा व्यापार अटींशी असलेला संबंध दर्शविण्यासाठी मिलच्याच सिध्दांताचा आधार घेतला आहे. मार्शल ह्यांनी मिलचेचे विश्लेषण भूमिती स्वरूपात विक्रय प्रस्ताव वक्राच्या साह्याने मांडले आहे.

ग्रॅहम म्हणतात, ''एखाद्या देशाला आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणारा लाभ, व्यापाराचे संतुलन साधणारा विनिमय दर व अंतर्गत विनिमय दर ह्यांच्यामधील अंतरावर अवलंबून राहील. के अंतर जेवढे जास्त तेवढा त्या देशाला लाभाचा मोठा हिस्सा मिळेल.''

सॅम्युअलसनच्या मते, ''कोणत्याही एका देशाला मिळणारा लाभ त्या देशाच्या उत्पादन व्ययाची संरचना व व्यापारात अंतर्भूत होणाऱ्या वस्तूंचे आंतरराष्ट्रीय विनिमय गुणोत्तर ह्यामधील विचलनावर अवलंबून असते. देशातील घटक अभिदान व जगातील सर्व सामान्य घटक भिदाने ह्या त जेवढे अंतर जास्त तेवढ्या मोठ्या प्रमाणात लाभ मिळू शकतो.''

वरील विवेचनावरून दिसून येते की व्यापार लाभ कोणत्या परिस्थितवर अवलंबून असतो हे निश्चितपणे सांगणे कठीण आहे.

व्यापार लाभ निर्धारित करणारे घटकः

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे सर्व देशांना लाभ होतो परंतु विभिन्न देशांमध्ये ह्या लाभाचे वितरण विभिन्न तत्वांद्वारे स्पष्ट करण्यात येते. उत्पादन व्ययानूसार लाभाच्या परिमाणात परिवर्तन घडून येते व दोन भिन्न देशात एकाच वस्तूच्या उत्पादन व्ययात भिन्नता येते. ह्या भिन्नतेमुळेच व्यापार लाभ होतो. आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणारा लाभ पुढील गोष्टींवर अवलंबून असतो.

१. व्यापार अटींचे स्वरूप : सामान्यतः व्यापार अट अनुकूल असेल तर व्यापार परिणामात व लाभात वाढ होते. ही अनुकूलता मागणीच्या लवचिकतेवर अवलंबून असते. विदेशी वस्तूकरीता मागणीची लवचिकता कमी असेल व विदेशी आयातीकरिता मागणी जास्त लवचिक असेल तर व्यापार अटी स्वदेशाला अनुकूल होतात. उलट परिस्थीत प्रतिकूल होतात. टॉसिंग म्हणतात, ''ज्या देशाच्या वस्तूकरिता विदेशात अधिक मागणी असते परंतु ह्या देशाची विदेशी वस्तूकरिता मागणी कमी असते तेव्हा ह्या देशाला सर्वात जास्त लाभ होतो.''
२. उत्पादन कार्यातील कौशल्य : कोणताही देश जेव्हा विशिष्ट उत्पादनाचे विशेषीकरण करतो तेव्हा त्या देशाची उत्पादनातील कार्यक्षमता व कुशलता वाढते. त्यामुळे उत्पादन व्यय कमी होतो. कार्यक्षमतेमुळे ह्या देशाला लाभ मिळतो व त्याचबरोबर व्यापार अटी अनुकूल होतात. अशा परिस्थितीत व्यापाराचे परिमाण व लाभाची मात्रा ह्या दोन्हीतही वृध्दी होते.
३. विक्री क्षमता (विक्री कोशल्य) : देशाच्या विक्रीक्षमतेवर सुध्दा लाभाची मात्रा अवलंबून असेत. कारण ह्या विक्रीक्षमतेमुळे नवीन बाजारपेठेमध्ये नवीन ग्राहक आकर्षित करता येतात. त्यामुळे मालाची विक्री व लाभ दोन्ही वाढतात.
४. अन्योन्य किंवा पारस्पारिक मागणीची लचचिकताः जेव्हा दोन्ही देशांची परस्परांच्या वस्तूकरिता असणारी मागणीची लवचिकता व पुरवठ्याची लवचिकता ह्यांच्यात व्यवस्थीत सामंजस्य प्रस्थापित होत असेल तर

आंतरराष्ट्रीय व्यापारापासून लाभ प्राप्त होतो. दोन देशांमध्ये जर परस्पर देवाण-घेवाण होत असेल तर दोन्ही देशातील प्रत्येक वस्तूची आयात मात्रा ही त्या वस्तूच्या मागणीच्या लवचिकतेवर अवलंबून असते.

५. तांत्रिक प्रगती : ज्या देशाजवळ पुरेशा प्रमाणात भांडवल उपलब्ध आहे तसेच तांत्रिक व आर्थिक परिस्थिती प्रगतीपथावर आहे अशा देशातील वस्तूंकरीता अधिक मागणी असते. अशा देशांचा विदेशी व्यापार यशस्वी होतो. याउलट जे देश तांत्रिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेले असतात, ज्या देशांच्या उद्योगात श्रमाचा मोठ्या प्रमाणावर व भांडवलाचा अतिशय कमी वापर असतो अशा देशांचा विदेश व्यापार कमी असतो व त्यापासून मिळणारा लाभ पण कमी असतो. कारखानी वस्तूंची निर्यात करणारया देशांना व्यापार अटी अनुकूल असतात व व्यापार जास्त होतो. याउलट प्राथमिक वस्तूंची निर्यात करणाऱ्या देशांना व्यापार अटी प्रायः प्रतिकूल असतात व त्यामुळे व्यापार लाभही कमी असतो.

६. दोन देशातील दोन वस्तूंच्या उत्पादन व्ययातील अंतर : दोन देशातील वस्तूंच्या उत्पादन खर्चाचे प्रमाण किंवा व्यय अनुपात भिन्न असतात तेव्हा विदेशी व्यापाराचा लाभ दोन्ही देशांना होतो. ह्या व्यय प्रमाणातील अंतर जसजसे कमी होत जाते तसतसा व्यापार लाभ कमी-कमी होत जातो. व हे अंतर जेव्हा पूर्णपणे नाहीसे होते म्हणजेच दोन देशातील व्यय गुणोत्तरे समान होतात तेव्हा व्यापार लाभ नष्ट होतो.

अशाप्रकारे व्यापार लाभावर परिणाम करणारे जे विविध घटक आहेत त्यापैकी महत्वांच्या घटकांचे आतार्यंत विवेचन केले.

व्यापार-लाभाचे मोजमाप :

व्यापार लाभ मोजण्याकरिता परंपरावादी किंवा अभिमतपंथी अर्थशास्त्रज्ञांनी ज्या तीन पध्दतीचा वापार केला त्यांचा उल्लेख ह्या प्रकरणाच्या सुरूवातीलाच केला आहे.

एखाद्या विशिष्ट कालखंडात कोणत्याही देशाला मिळणाऱ्या व्यापार लाभावर ज्या विशिष्ट कारकांचा प्रभाव पडतो त्यांचे विश्लेषण केल्यास व्यापार लाभाचे मोजमाप करता येते. सामान्यतः पुढील कारकांचा प्रभाव पडतो.

१. वस्तूच्या उत्पादन खर्चात घट (Decrease in the production Cost) : आयात किंवा निर्यात होणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनव्ययात स्वदेशात किंवा विदेशात कुठेही घट झाली तरी व्यापार लाभात वाढ होते. समजा स्वदेश विदेशातून ज्या वस्तूंची आयात करतो त्यांचा उत्पादन व्यय काही कारणाने घटला तर त्या आयातींची किंमत कमी झाली तर स्वदेश व विदेश ह्यांच्या व्यापार परिमाणात व व्यापार लाभात वाढ होते. तसेच स्वदेश निर्यात करीत असलेल्या वस्तूंच्या उत्पादन व्यय कमी झाल्यास व्यापार लाभात वाढ होते.

आणखी एक शक्यता म्हणजे स्वदेश काही प्रमाणात विशिष्ट वस्तु तयार करतो व ती काही प्रमाणात आयातही करत असताना त्या विशिष्ट वस्तू या स्वदेशातील उत्पादनव्यय वाढला असता आयतीच्या व त्यांच्या बदलत्या दिल्या जाणाऱ्या निर्यातीच्या परिमाणात व संरचनेत कोणताही बदल झाला नसला तरी देशाला मिळणाऱ्या लाभात वाढ होते. उत्पादनाचे विशेषीकरण व श्रमविभागणी ह्यामुळे उत्पादन वृध्दी व लाभ वृध्दी होते.

२. वास्तविक उत्पन्नात वृध्दी (Increase in Real Income) : देशांच्या वास्तविक उत्पन्नात वाढ होणे हा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सर्वात मोठा लाभ आहे. त्यानुसार शुध्द राष्ट्रीय उत्पन्नात ही वाढ होते. ओद्योगिक

प्रगति होणे हा उत्पन्नातील वाढीचा आधार आहे. औद्योगिक विकासामुळे बेरोजगारी घटते व उत्पादन वाढते. रोजगारी वाढते, रोजगारीचे दर वाढतात त्यामुळे त्यांच्या राहणीमानाचा दर्जा वाढतो. मौद्रिक उत्पन्नात भर पडते.

३. अनुकूल व्यापार अटी () : व्यापारातून मिळणाऱ्या लाभाची प्रवृत्ती दर्शविण्याचे कार्य व्यापार अटी करत असतात. जेव्हा व्यापार अटी अनुकूल होतात तेव्हा त्या देशाला व्यापारापासून लाभ प्राप्त होत असतो. वस्तूगत व्यापार अटीद्वारे, निर्यातीमुळे देशाला प्राप्त होणाऱ्या किंमत व आयातीकरिता द्याव्या लागणाऱ्या किंमती ह्यांच्यातील संबंध कळून येतो. निर्यात वस्तूच्या किंमत वाढ व आयात वस्तूंच्या किंमतीत घट होते तेव्हा व्यापार अटी सुधारतात.

४. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या आकारमानात व रचनेत बदल : आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या आकारमानात व त्याच्या संरचनेत बदल घडून आल्यास त्याचे लाभावर काय परिणाम होतील ह्याबाबत सामान्यतः असे म्हणता येईल की, निर्यात होणाऱ्या वस्तूंच्या उत्पादन व्ययात, आयात होणाऱ्या मालाच्या संथाव्य स्वदेशी व्ययात व ह्या दोहोंच्या विनिमय गुणोत्तरात कोणताही बदल न झाल्यास, व्यापाराच्या आकारमानातील वाढीमुळे राष्ट्रीय उत्पन्नात व आवडी निवडीत बदल घडून येतात. परिणामतः व्यापार लाभात वाढ झाल्याचे दिसून येते. निरनिराळ्या आयात वस्तूंपासून तसेच निर्यात होणाऱ्या वस्तूंपासून मिळणारा लाभ हा समान नसून भिन्न भिन्न असतो. आयात वस्तूकरिता द्यावी लागणारी किंमत व स्वदेशातील उत्पादन किंमत ह्यातील अंतर प्रत्येक वस्तूनुसार वेगवेगळे असते. त्यामुळे व्यापाराचे आकारमान पूर्ववत् राहूनही तुलनात्मक उत्पादन व्ययात कमी अंतर असलेल्या वस्तूऐवजी तुलनात्मक परिव्ययात जास्त अंतर असलेल्या वस्तूंचा व्यापारात अंतर्भाव होत असेल तर व्यापार लाभात वाढ झालेली दिसून येते. याउलट आंतरराष्ट्रीय व्यापारात तुलनात्मक व्ययात कमी अंतर असलेल्या वस्तूंचा जास्त प्रमाणात समावेश असेल तर व्यापारात लाभात घट झालेली आढळून येते.

व्यापार न केल्याने होणाऱ्या हानीचे मोजमाप केल्यास आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणाऱ्या लाभाची कल्पना करता येते. काही विशिष्ट आयात वस्तूंचे उत्पादन स्वदेशात शक्य नसेल तर त्याचा लाभावर होणारा परिणामही विचारात घ्यावा लागतो. अशा वस्तूंचे उत्पादन स्वदेशात शक्य नसेल तर त्याचा लाभावर होणारा परिणामही विचारात घ्यावा लागतो. अशा वस्तूंचे उत्पादन देशात करण्याचे ठरविल्यास तिचा व्यय अपरिमित राहील. म्हणून अशी वस्तू जर विदेशी व्यापारात असेल तर व्यापार लाभ हा अपरिमित राहील. अर्थात असे म्हणणे सुसंगत नाही. ही अडचण सोडविण्यासाठी अशा वस्तूंच्या उपभोगापासून देशाला वंचित रहावे लागल्यास प्रत्यक्ष हानी किती होते ह्याचा शोध घेतला पाहिजे. अशा वस्तूंचा उपभोग घेतल्याने मिळणारे समाधान मोजावे लागेल. नंतर त्यांच्या बदलत्या निर्माण होणाऱ्या वस्तूंचे उत्पादन घेतल्याने मिळणारे समाधान मोजावे लागेल. नंतर त्यांच्या बदलत्या निर्माण होणाऱ्या वस्तूंचे उत्पादन थांबविण्यात जी साधने मोकळी होतील त्याद्वारे उत्पादित होणाऱ्या वस्तूपासून मिळणारे समाधान मोजावे लागेल. ह्या दोन समाधानातील अंतर प्रत्यक्ष हानीचा अंदाज देऊ शकते. अर्थात समाधान हा मानसिक अनुभव असल्यामुळे त्याचे प्रत्यक्ष मोजमाप करणे जवळपास अशक्यच आहे.